नि. दि. दा. क्र. १०२/२०१३
शेषराव विरुध्द कमलाबाई
निशाणी क्र.२७

**वादीतर्फे साक्षीदार क्र.१ ची सरतपासणी विधीज्ञ श्री. व्ही.डी.मुळे यांच्या मार्फत शपथेवर सुरु –**

०८. मी माझ्या पुराव्यामध्ये माझे शपथपत्र दाखल केले आहे. आता मला ते शपथपत्र दाखवले, हे तेच आहे. त्यातील मजकूर मला माझ्या वकीलांनी मराठी भाषेमध्ये समजावून सांगितला आहे. तो मी मराठीमध्ये मी सांगितल्याप्रमाणेच आहे. तो खरा असून त्यावर माझी सही आहे. शपथपत्र **निशाणी क्र.२७** वर आहे.

**सरतपास – संपुर्ण.**

**उलट तपास प्रतिवादीचे विधीज्ञ श्री. एम.सी.खंगारे यांचे मार्फत**

०९. मी दहा ते अकरा वर्षाचा असतांना माझ्या नावे स्वतंत्र पैसे असल्याबाबत माझ्याकडे कोणताही दस्त उपलब्ध नाही. मी दहा वर्षांचा असतांना लोकांच्या शेतात कामाला जात होतो हे दाखविण्यासाठी माझ्याकडे कोणताही दस्त उपलब्ध नाही. माझे वडील त्यांच्या लग्नापूर्वीपासून ईतर लोकांच्या शेतात जावून मजूरी करत.माझे वडीलच माझा व माझ्या बहीणीचा शिक्षणाचा व ईतर खर्च करत. माझे वडीलच जिवंत असेपर्यंत कूटूंबातील कर्ता पुरुष होते. दोन्ही शेती खरेदी केलयानंतर माझे वडील आठ ते दहा वर्षे हयात होते.माझे वडील हयात असेपर्यंत मी त्यांना माझा स्वतंत्र हिस्सा मागणी केला नाही. वडीलांच्या मृत्यूनंतर माझे, माझ्या बहीणीचे व आईचे नाव महसूल विभागात नोंद केले. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, ते नाव माझ्या माघारी नोंद करण्यात आले होते. मी त्या फेरविरुध्द कधीही आक्षेप नोंदविला नाही. दोन्ही शेतजमिनीमध्ये माझ्या बहीणीचा हिस्सा असल्याचे मला मान्य आहे.

**नि. दि. दा. क्र. १०२/२०१३**
**शेषराव विरुध्द कमलाबाई**
**निशाणी क्र.२७**

१०. गावातील घर माझ्या वडीलांच्या नावे होते. ते घर माझे वडील हयात असेपर्यंत त्यांच्याच नावे होते. त्या घराचा देखील कोणताही दस्त माझ्या वडीलांनी माझ्या नावे करुन दिला नाही. ते घर मी पैसे देवून माझ्या नावे लावून घेतले होते. ते पैसे मी माझ्या वडीलांना दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या वडीलांना पैसे दिल्याचे, मी खोटे कथन करत आहे. मी पैसे दिल्याबद्दल माझ्या वडीलांकडून कोणताही दस्त तयार केला नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, माझे वडील दोन वेळेस सावनेरला आले परंतू कोणताही दस्त न करता पळून गेले. माझे वडील हयात असेपर्यंत माझ्यासोबतच राहत होते. माझे वडील सन २००४ मध्ये मयत झाले.

११. गंगाबाई माझी आई आहे. चंद्रकलाबाई सिताराम वाडी माझी बहीण आहे. हे मला माहित नाही की, गंगाबाई व चंद्रकलाबाई यांनी वादीच्या नावे विना मोबदला हक्कसोड लेख केला आहे किंवा नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझी आई वादीकडे मरण पावली. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, माझी आई, बहीण चंद्रकलाबाई यांच्याकडे मयत झाली. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या आईची देखभाल करत नव्हतो, तिची काळजी घेत नव्हतो म्हणूनच माझ्या आईने व चंद्रकलाबाईन हक्कसोड लेख वादीच्या नावे करुन दिला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास – संपुर्ण.** **फेर तपास – नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत
sd/-
(एस.आर.भरड)
सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर,
सावनेर

दिनांक १४/०१/२०२५

**<u>C E R T I F I C A T E</u>**

"I affirm that the contents of this P. D. F. File is word to word as per original."

**Name of Stenographer : S. A. Misal**